# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 190/2023 दिनांक : 14.05.2023

## 1)मो.सा. चोरी :–

**बिलोली** :–दिनांक 11.05.2023 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोरील रोडवर मौजे बडूर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच–26/एई–0859 किंमती 35,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी नागनाथ मल्लू बळते, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. बडूर ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 80/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1985 शिंदे, मो.क्रं. 8421453868** हे करीत आहेत.

## 2)रेती चोरी :–

**कुंटूर** :–दिनांक 13.05.2023 रोजी 01.00 वा. चे सुमारास, **मौजे धनज शिवारातील गोदावरी नदी पात्रात ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील एक फिकट लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा विना क्रंमाकाचे ट्रक्टर हेड व लोखंडी गुडगुडीच्या साहयाने मौजे धनज येथील गोदावरी नदीचे पात्रात अवैद्य काळया रंगाच्या रेतीचे उत्खनन स्वतःच्या फायदयासाठी तिची चोरी करून फिर्यादीस पाहुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/नागोराव महिपतराव पोले, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 82/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1592 निकम, मो.क्रं. 02465–258533** हे करीत आहेत.

## 3)फसवणुक :–

**कंधार** :– दिनांक 10.05.2022 रोजी 11.30 वा. ते 13.30 वा. चे दरम्यान, **बसस्थानक कंधार व जळकोट जि. लातुर येथे,** यातील फिर्यादी हा पैसे काढण्यासाठी एसबीआय एटीएम येथे जाऊन एटीएम मधुन पैसे काढीत असतांना त्याचे पैसे एटीएम मधून निघाले नसल्याने यातील अनोळखी व्यक्तीने फिर्यादीस मिनी स्टेटमेंट काढुन पाहूत असे म्हणुन फिर्यादी जवळ त्याचे वडीलाचे नावे असलेले एटीएम कार्ड फिर्यादी कडून घेवून फिर्यादीची नजर चुकवून एटीएम कार्डची आदलाबदली करून आरोपीने त्याचे जवळील एम. तोटेवाड या व्यक्तीचे एटीएम कार्ड देवून फिर्यादी जवळील एटीएम कार्ड घेवून जळकोट येथे एटीएम मध्ये जावून फिर्यादीने सांगितलेला पासवर्ड वापरून एटीएम कार्डमधून एकुण 38,000/– रूपये काढुन घेवून फिर्यादीची फसवणूक केली.वगैरे **फिर्यादी शिवम राजेश राठोड, वय 16 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. मुक्ताईनगर, कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 136/2023 कलम 420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.नं. 9823391570** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**ईस्लापुर** :– दिनांक 13.05.2023 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **कोस्मेट शिवारात आंब्याचे झाडाखाली, ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1350/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री बाबुराव बोधगिरे, ने. पोस्टे ईस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरनं 55/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री तोंडेवाड, मो.क्रं. 8707824996** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**धर्माबाद** :– दिनांक 13.05.2023 रोजी 12.20 वा. चे सुमारास, **आंध्र बसस्थानक धर्माबाद, ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी किंमती 4560/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/937 पुंडलिक माधवराव केंद्रे, ने. धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 104/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री मसलेकर, मो.नं. 9370467775** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र.   191/2023        दिनांक : 14.05.2023**

पोलीस अधिक्षक कार्यालयात "**छत्रपती संभाजी महाराज**" यांची जयंती साजरी

14 मे, 2023 रविवार रोजी "**छत्रपती संभाजी महाराज**" या महापुरूषाची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शना खाली सर्व उपस्थितांनी पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्री संजय सोनसकर**, सपोनि पोलीस नियंत्रण कक्ष, नांदेड, यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, पोहेकॉ/संजय सांगवीकर, मपोकॉ/शामका पवार, पोकॉ/विनांदे भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

